सोशल ऑडिट म्हणजे काय?

सरकारमार्फत पुरविल्या जाणाऱ्या योजना लोकांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचल्या की नाही, याची पडताळणी लोकांच्या सहभागाने करणे म्हणजे 'सोशल ऑडिट' होय.

साथी

सोशल ऑडिटची प्रक्रिया

१. सरकारकडून माहिती मिळवणे व लोकांपर्यंत पोहचवणे

२. सरकारकडून मिळालेल्या माहितीची लोकांकडून पडताळणी करणे.

३. आपले म्हणणे मांडण्याची हक्काची जागा - जनसुनवाई

४. निश्चित कालावधीत कार्यवाही करणे

५. तक्रारदार व्यक्तीची सुरक्षितता निश्चित करणे

६. नागरिकांचा सक्रिय सहभाग

७. नागरिकांच्या हक्कासाठी सामूहिक मंच

साथी

सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेचे टप्पे

टप्पा- १

सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी गावांची निवड करणे.

साथी

टप्पा- २

गावांमध्ये भेट देऊन ज्या योजनांचे सामजिक अंकेक्षण करायचे त्याची यादी तयार करणे, तसेच तालुक्याचे गट विकास अधिकारी यांची भेट घेणे.

गट विकास अधिकारी यांच्याशी बोलण्याचे मुद्दे-

गावांची आणि गावातील योजनांची यादी निश्चित झाल्यानंतर ती माहिती तालुका गट विकास अधिकारी यांना द्यावी व सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया कशा पद्धतीने होणार आहे त्याबद्दल त्यांच्याशी चर्चा करावी, गट विकास अधिकारी यांनी गावातील संबंधित योजनांची सर्व शासकीय माहिती सामाजिक अंकेक्षण करणाऱ्या गटाला देण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना आदेश द्यावेत.

साथी

टप्पा- ३

गावांमध्ये सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी गट बांधणी करणे.

या गटात शक्यतो सरकारचे प्रतिनिधी आणि योजनांच्या निधीशी संबंधित सह्या करणारे गावातील प्रतिनिधी नसावेत, गट ८ ते १० जणांचा असावा.

साथी

टप्पा- ४

गटाचे सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया कशी करायची आहे याबाबत प्रशिक्षण घेणे.

प्रशिक्षणामध्ये ज्या योजनांचे अंकेक्षण करायचे त्या योजनांची माहिती देणे. शासकीय कर्मचाऱ्यांकडून जी माहिती घेतली जाणार आहे त्या माहितीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असेल त्याचे फॉरमॅट समजून सांगणे.

साथी

टप्पा -५

प्रत्यक्ष लाभार्थी भेट आणि माहितीची पडताळणी

सामाजिक अंकेक्षण करणाऱ्या गटाने सरकारकडून मिळालेली माहिती आणि लाभार्थ्यांकडून मिळालेली माहिती याची पडताळणी करून त्यात काही तफावत असेल तर ते मुद्दे अधोरेखित करणे.

त्याबाबत लाभार्थ्यांची तक्रार असेल तर ती त्यांच्याकडून लिहून घेणे. (सामाजिक अंकेक्षण करणारा गट शक्यतो दुसऱ्या गावात जाऊन सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया पूर्ण करेल. या संपूर्ण प्रक्रियेत काम करणारी व्यक्ती तटस्थ असणे आवश्यक आहे.)

टप्पा – ६ प्रत्यक्ष जनसुनवाई

सामाजिक अंकेक्षण करणाऱ्या गटाने गावात सर्व ग्रामस्थ, ग्राम पंचायत पदाधिकारी, संबंधित योजनांचे अधिकारी, गट विकास अधिकारी, पडताळणी प्रक्रियेतील तक्रारदार व्यक्ती या सर्वांना सोबत घेऊन जनसुनवाई आयोजित करणे अपेक्षित आहे. यावेळी प्रत्यक्ष तक्रारदारांनी पुढे येऊन आपल्या तक्रारी मांडणे अपेक्षित आहे आणि त्यावर संबंधित यंत्रणेने उत्तर देऊन ही तक्रार निवारण करणे अपेक्षित आहे.

साथी

टप्पा -७

सामूहिक मंचाची स्थापना करून जनसुनवाईमध्ये झालेल्या निर्णयांचा पाठपुरावा करणे.

सरकारी यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी, काही ठरावीक तटस्थ असलेले ग्रामस्थ आणि गावातील लोकप्रतिनिधी यांचा एकत्रित सामूहिक मंच/समिती स्थापन करणे.

या मंचाच्या किंवा समितीच्या माध्यमातून सामाजिक अंकेक्षणासंबंधी झालेल्या निर्णयांचा पाठपुरावा करणे व जे मुद्दे जनसुनवाईमध्ये सुटले नव्हते ते मुद्दे सोडवणे अपेक्षित आहे.

टप्पा -७

सामूहिक मंचाची स्थापना करून जनसुनवाईमध्ये झालेल्या निर्णयांचा पाठपुरावा करणे.

पुढील काळात हा मंच/समिती सक्रीय राहील ही जबाबदारी गावातील ग्रामस्थांची असेल. लोकशाही प्रक्रियेत सत्तेचा समतोल साधण्यासाठी आणि लोकांचे हक्क मिळवण्यासाठी केलेल्या सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेतून तयार झालेला हा मंच ही या प्रक्रियेची प्रमुख उपलब्धी आहे आणि हा मंच त्याच भूमिकेतून आपले काम करेल हे अपेक्षित आहे.